# ऋणनिर्देश

"व्यंकटेश माडगूळकर व चारुता सागर यांच्या कथेतील उपेक्षितांचे चित्रण" ('ओझं' व 'नागीण' च्या अनुषंगाने) या लघुप्रबंधासाठी संशोधन करताना मला अनेक व्यक्तींचे सहकार्य लाभले त्यांचे ऋण व्यक्त करणे मी माझे आद्य कर्तव्य समजते.

या संशोधन कार्यासाठी डॉ. वि. दा. वासमकर सरांसारखे मार्गदर्शक मला भेटले हे मी माझे भाग्य समजते. माझ्यासारख्या नवख्या संशोधकाकडून त्यांनी अतिशय प्रेमाने व काटेकोरपणे काम करून घेतले. हे करीत असताना त्यांनी आपल्या महत्त्वाच्या कामातून वेळ काढून मला मार्गदर्शन केले. आवश्यक ते साहित्य उपलब्ध करून दिले. संशोधनकार्यव्यतिरिक्त इतर अडचणीतही ते माझ्या मदतीला धावून आले. मला त्यांच्या ऋणात रहायलाच आवडेल.

सरांच्या घरीही मला आपलेपणाची वागणूक मिळाली. सरांच्या पत्नी सौ. रेखा वासमकर यांचा आमच्यापेक्षा वेगळा विषय असूनही त्यांनी माझ्या प्रबंधाविषयी वेळोवेळी चौकशी करून प्रोत्साहन दिले. त्यांच्या आपुलकीबद्दल मी त्यांची खूप खूप आभारी आहे.

माझ्या शिक्षणासाठी आमच्या घरातून ज्यांनी प्रोत्साहन दिले. ते माझे सासरे श्री. पांडुरंग विठोबा यमगर व सासू सौ. चंद्रकला पांडुरंग यमगर तसेच माझे प्रेरणास्थान व वेळोवेळी माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे माझे पती श्री. वैभव पांडुरंग यमगर या सर्वांची मी शतशः ऋणी आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. रविंद्र ठाकूर सर, प्रा. डॉ. विश्वनाथ शिंदे सर, प्रा. डॉ. कृष्णा किरवले सर, प्रा. रणधीर शिंदे, सौ. शिगावकर मॅडम त्याचप्रमाणे मराठी विभागातील सर्व कर्मचारी, सर्व संशोधक विद्यार्थी व

विद्यापीठातील मित्रमैत्रिणी यांचेही मला मोलाचे सहकार्य लाभले या सर्वांचे मी मनापासून आभार व्यक्त करते.

शिवाजी विद्यापीठाचे ग्रंथपाल आणि त्यांचे सर्व सहकारी कर्मचारी, तसेच विलिंग्डन महाविद्यालयाचे ग्रंथपाल आणि त्यांचे ग्रंथालयातील सर्व सहकारी कर्मचारी यांनी मला संदर्भसाहित्य उपलब्ध करून दिले याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

मिरज येथील खरे मंदिर वाचनालयमधील श्री. भंडारे सर यांनीही मला वेळोवेळी संदर्भग्रंथ उपलब्ध करून दिले, त्याबद्दल मी त्यांचे आभार मानते.

कोल्हापूर येथील श्री. आमोद दंडगे व सौ. प्रिया दंडगे यांनी माझ्या प्रबंधाविषयी आस्था दाखवली व वेळोवेळी मार्गदर्शन करून प्रोत्साहन दिले याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

श्री. अरविंद चाटे (अक्षय कॉम्प्युटर्स, मिरज) यांनी आत्मीयतेने सुबक व वेळेत माझा प्रबंध पूर्ण करण्यास सहकार्य केले याबद्दल मी त्यांचीही आभारी आहे.

**– सुवर्णा रामचंद्र शिंगाडे**

**प्रास्ताविक :**

व्यंकटेश माडगूळकर आणि चारुता सागर यांनी आपल्या मोजक्याच कथालेखनाने मराठी कथेमध्ये मोलाची भर घातली आहे. व्यंकटेश माडगूळकर यांचे तीस कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. यामध्ये 'काळी 'आई', 'ओझं', 'माणदेशी माणसे', इत्यादी कथासंग्रहांचा समावेश होतो. त्याचप्रमाणे 'बनगरवाडी', 'सत्तांतर' या कादंबऱ्या रसिकप्रिय झालेल्या आहेत. चारुता सागर यांचा 'मामाचा वाडा', 'नागीण' हे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. अशाप्रकारे या दोन कथाकारांच्या दर्जेदार साहित्य कृतींना चोखंदळ वाचकांचे व समीक्षकांचे लक्ष वेधून घेतले आहे. प्रस्तुत लघुशोधप्रबंधात व्यंकटेश माडगूळकर व चारुता सागर यांच्या कथेतील उपेक्षितांचे चित्रण 'ओझं' व 'नागीण' च्या अनुषंगाने तपशिलाने शोध घेतला आहे.

**प्रस्तुत अभ्यास पुढील प्रकरणांमधून केला आहे.**

१) व्यंकटेश माडगूळपूर्व मराठी कथेतील उपेक्षितांचे चित्रण

२) व्यंकटेश माडगूळकर यांच्या कथेतील उपेक्षितांचे चित्रण

३) चारुता सागर यांच्या कथेतील उपेक्षितांचे चित्रण

४) व्यंकटेश माडगूळकर व चारुता सागर यांच्या कथेतील सामाजिक व नैतिक दृष्टिकोण

५) उपसंहार

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.